कि.दि.अर्ज.क्र.३३/२०२३ (नि.२८ लगत)

उलटतपास शपथेवर सुरु

उलटतपास सामनेवालातर्फे ॲड.श्री. एन. एम. वाडीकर

१) हे म्हणणे खरे आहे की मी आजरोजीचा जबाब हा दि.२५.०३.२०२२ रोजी देण्यात आलेल्या मुखत्यारपत्रावरुनच देत आहे. हे म्हणणे खरे आहे की सदरच्या मुखत्यारपत्रानुसार मुखत्यारपत्र झाल्यानंतर काय करायचे याबाबतचे अधिकार मला देण्यात आले आहेत. हे म्हणणे खरे आहे की दि.२५.०३.२०२२ रोजीच्या मुखत्यारपत्राच्या पुर्वीच्या गोष्टींची मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर मुखत्यारपत्रामध्ये आवश्यकता असल्यास व तशी सुचना दिल्यानंतर मला कारवाई करता येईल असे नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की स्पे.दि.मु.नं.९२/२०१४ मधील दि.०२.११.२०१८ रोजी केलेल्या एकतर्फा न्यायनिर्णयाविरुद्ध अर्ज करण्यासाठी मला अर्जदार यांनी सुचना दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की पुढील सुचना त्यांनी मला लेखी देणे अपेक्षित होते. त्यांनी मला लेखी सुचना दिलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की सदर मुखत्यारपत्रानंतर स्पे.दि.मु.नं.९२/२०१४ मधील झालेल्या एकतर्फा न्यायनिर्णयाविरुद्ध अर्ज करण्यासाठी मला अर्जदार यांनी लेखी सुचना दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की तशी लेखी सुचना दिलेली नसल्याने मला प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की मी अर्जदार यांनी मला लेखी सुचना दिली याबाबतचा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर मुखत्यारपत्रामध्ये 'सदर मुखत्यार याचे अधिकार दि.०५.०१.२०२४ रोजी संपुष्टात येतील' असे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर मुखत्यारपत्रावरुन मला हा जबाब दाखल करण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की सन २०१४ म्हणजेच दावा दाखल केल्यापासुन त्याचा निकाल लागेपावेतो मी त्या प्रकरणात कोणतीही कारवाई केली नसल्याने मला त्याबाबतची वैयक्तीक माहिती नाही.

२) हे म्हणणे खरे आहे की स्पे.दि.मु.नं.९२/२०१४ या दाव्याचे समन्स अर्जदार

यांना मिळाले होते. हे म्हणणे खरे आहे की अर्जदार यांनी सपकाळ वकील यांचे वकीलपत्र दाखल करुन त्या दाव्यामध्ये हजर झाल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की अर्जदार यांनी सदर दाव्यामध्ये मुदतीत कैफियत दाखल न केल्याने त्यांचेविरुद्ध विना कैफियत आदेश पारीत करणेत आला. हे म्हणणे खरे आहे की त्यांनी त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्याकरीता न्यायालयात अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे आहे की सदर अर्ज रक्कम ₹.५००/- जमा करण्याच्या अटीवर मंजुर करणेत आला होता. हे म्हणणे खरे आहे की सदर रक्कम अर्जदार यांनी न भरल्यामुळे दावा बऱ्याच कालावधीकरीता प्रलंबीत होता. हे म्हणणे खरे आहे की दाव्याचा अंतीम निकाल होईपावेतो अर्जदार हिची मानसिक स्थिती चांगली होती. हे म्हणणे खरे आहे की दावा दाखल केल्यापासुन त्याचा निकाल होईपावेतो अर्जदार व त्यांचे पती मोबाईल फोन वापरत होते. हे म्हणणे खरे आहे की त्या कालावधीत सपकाळ वकील हे देखील मोबाईल फोन वापरत होते. हे म्हणणे खरे आहे की अर्जदार यांनी सदर कालावधीमध्ये त्यांच्या वकिलांसोबत फोनद्वारे संपर्क साधुन दाव्याची परिस्थिती जाणुन घेण्याचा प्रयत्न केला नाही. फेब्रुवारी २०२५ पासुन त्यांची मानसिक स्थिती आजारपणामुळे खराब झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की सन २०१४ पासुन प्रस्तुतचा अर्ज दाखल करेपर्यंत अर्जदार यांनी त्यांच्या वकिलांशी संपर्क साधणेचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्याच्या दिवशी अर्जदार यांना सही करणेस कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की अर्जात व जबाबात स्पे.दि.मु.नं.९२/२०१४ मध्ये उपस्थीत राहु न शकण्यासाठी जी कारणे नमुद केलेली आहेत ती खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की अर्जदार यांची अर्ज दाखल करतेवेळी शारिरीक व मानसिक स्थिती चांगली असल्याने मला प्रस्तुतचा अर्ज मुखत्यार म्हणुन दाखल करण्याची कोणतीही गरज नव्हती. हे म्हणणे खरे आहे की सन २०१८ ते प्रस्तुतचा अर्ज दाखल करेपर्यंत अर्जदार यांनी त्यांच्या वकिलांविरुद्ध माहिती न दिल्याबद्दल तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की दरखास्तीतील नोटीस मिळाल्यापासुन फेब्रुवारी २०२५ पर्यंत अर्जदार यांनी त्यांच्या वकिलांविरुद्ध तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की मी देखील सदर वकिलांविरुद्ध तक्रार केलेली नाही व त्यांच्याकडुन स्पष्टीकरण मागितलेले

नाही. हे म्हणणे खरे आहे की मी त्यांच्याकडुन स्पष्टीकरण का मागवले नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे मला सांगता येणार नाही की अर्जदार यांची इतर प्रकरणे न्यायालयात चालु आहेत किंवा कसे. मी सपकाळ वकील यांची साक्ष माझ्या वकिलांनी सांगितल्यास नोंदवेन. हे म्हणणे खरे आहे की कोव्हीड संसर्गामुळे दि.२०.०३.२०२० ते सप्टेंबर २०२१ पर्यंत माणसांना बाहेर फिरण्यास बंदी होती. हे म्हणणे खरे आहे की न्यायनिर्णय व हुकूमनाम्याच्या नकला मला डिसेंबर २०२१ मध्ये मिळाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की सप्टेंबर २०२१ मध्येच कोव्हीडचा संसर्ग संपल्याने मी सरतपासात त्याबाबत नमुद केलेला मजकुर चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की अर्जामध्ये कोव्हीड संसर्गाबाबत जो संदर्भ नमुद केलेला आहे तो मला झालेल्या कोव्हीड आजाराबाबत आहे. हे म्हणणे खरे आहे की अर्जदार अथवा मला सदर कालावधीमध्ये कोव्हीड झाला होता याबाबतचा मी कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की अर्जदार व त्यांचे पती हे त्यांचे पती मयत होईपावेतो एकाच घरात रहात होते. हे म्हणणे खरे आहे की नवलकिशोर डिडी यांच्याकडे जी कागदपत्रे उपलब्ध होती ती अर्जदार यांच्या घरातच होती. हे म्हणणे खरे आहे की अर्जदार हया मला दि.२५.०३.२०२२ पुर्वीदेखील मुखत्यारपत्र देवु शकत होत्या. हे म्हणणे खरे आहे की कागदपत्र मिळाल्यानंतर अर्जदार यांच्या वयाच्या कारणामुळे अर्ज दाखल करण्यास कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील परिच्छेद क्रं.१४ मध्ये नमुद असलेली कारणे खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की अर्जामध्ये वकिलांनी माहिती दिली नाही याबाबतचा अनावश्यक मजकुर मी नमुद केला आहे. हे म्हणणे खरे आहे की अर्जदार हिने तिच्या वकिलांकडे पैसे दिले होते व ते वकिलांनी जमा केलेले नाहीत असे अर्जात नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रस्तुत प्रकरणामध्ये गैरहजर राहण्यास व एकतर्फा निकाल होण्यास केवळ अर्जदार कारणीभुत आहे आणि अर्जदार यांचे वकील कारणीभुत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की अर्जात व सरतपासात नमुद केलेल्या कारणांबाबत माझ्या तोंडी शब्दाशिवाय इतर कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की अर्जात व सरतपासात नमुद केलेली सर्व कारणे खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की अर्ज दाखल करणेस बराच विलंब

का झाला याचे अर्जदार यांच्याकडे कोणतेही संयुक्तीक कारण नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई.
दिनांक : ३०.०१.२०२६

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
वाई.